# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# सायबर फ्रॉड करणारी आंतरराष्ट्रीय टोळी गजाआड!

## सायबर फसवणुकीसाठी बँक खाते देणाऱ्या सहाजणांना अटक : पिंपरी चिंचवड पोलिसांची मोठी कामगिरी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड पोलिसांनी आंतरराष्ट्रीय सायबर टोळीचा पर्दाफाश केला आहे. कंबोडिया देशातून ही टोळी अनेक भारतीयांना गंडा घालत होती. या टोळीसाठी सक्रिय असणारा भारतातील मुख्य सुत्रधार सॅम उर्फ डेव्हिड उर्फ संबीधकुमार नायकच्या हिंजवडी येथे मुसक्या आळवण्यात पिंपरी चिंचवड पोलिसांच्या सायबर विभागाला यश आले आहे. मुख्य आरोपीसह झारखंड, गुजरात, उडीसा येथील पाच जणांना अटक करण्यात आली आहे.



पोलिसांनी याप्रकरणी सॅम ऊर्फ डेविड ऊर्फ संबीधकुमार श्रीपती नायक (वय २२ वर्षे रा. डी ११२, सेक्टर नं. १४, राऊलकिला, उडीसा), राजअंश सिंग संतोष सिंग (वय-२१ वर्षे, बेहरी हनुमान चौक, हनुमान मंदीरासमोर, हजारीबाग, झारखंड), प्रोफेसर उर्फ हिमांशुकुमार गणेश ठाकुर (वय २४ वर्षे रा. विलेज कुद, पोस्ट रेवाली, हजारीबाग, झारखंड), गौरव अनिलकुमार शर्मा (वय ४० वर्षे. राजन नगर, सोना कॉम्प्लेक्स, फ्लॅट नंबर १०२, बी विंग, वलसाड, गुजरात), अंकुश रामराव मोरे (वय ३१ वर्षे, रा. डी/२, ४०२, सेरीन मेडोज, गंगापुर खेड, नाशिक) यांना अटक केली आहे.

गुन्हे शाखेचे पोलीस उपआयुक्त संदीप डोईफोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, मूळचा उडीसा येथील सॅम चार वर्षांपूर्वी मुंबईत बॉलिवूडमध्ये चमकण्यासाठी आला होता. मात्र कालांतराने पैशांची चणचण भासू लागल्याने सॅमने सायबर गुन्ह्याची वाट धरली. पुढे तो कंबोडिया देशातील टोळीशी जोडला गेला. ही टोळी गुंतवणुकीच्या दृष्टीने बनावट अँप आणि वेबसाईटची निर्मिती करते आणि अनेक भारतीयांना गुंतवणूक केल्यास मोठा परतावा देण्याचं आमिष दाखवते. या आमिषाला बळी पडणाऱ्या व्यक्तींना पैसे गुंतवण्यासाठी जी बँक खाती दिली जायची, ती खाती बनवण्यासाठी सॅम कार्यरत होता. ज्यांना पैशांची गरज आहे, अशांच्या नावाने सॅम बँकेत खाती तयार करायचा. मग त्या खात्यात गुंतवणूकदार पैसे टाकायचे अन ते पैसे कंबोडियातील टोळी दुसऱ्या खात्यात वळवत असे. मग सॅम ज्याच्या नावाने बँकेत खातं आहे, त्याला पैसे द्यायचा. मात्र पिंपरी चिंचवडमधील फसवणूक झालेल्या एका गुंतवणूकदाराने सायबर विभागाची मदत घेतली आणि कंबोडिया देशासाठी काम करणाऱ्या भारतीय टोळीचा पर्दाफाश झाला आहे.

> नागरीकांना आवाहन शेअर मार्केटमध्ये गुंतवणुक करण्यासाठी सेबी पुरस्कत ॲप्लीकेशनचा वापर करावा. शेअर मार्केट गुंतवणुक करण्यासाठी सेबी पुरस्कत ॲप्लीकेशन हे वेगवेगळया खात्यांमध्ये पैसे भरण्यास सांगत नाहीत. शेअर मार्केटमध्ये गुंतवणुक करताना आपण बनावट प्लॅटफार्मवर गुंतवणुक करत नाहीत ना याची खात्री करावी. कोणत्याही परिस्थितीत आपला मोबाईल स्क्रिन, बैंक अकाऊंट, वैयक्तीक माहीती शेअर करु नये.
>
> **- संदिप डोईफोडे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे शाखा पिंपरी चिंचवड.**

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक रविकिरण नाळे, सहायक पोलिस निरीक्षक प्रविण स्वामी, पोलीस उपनिरीक्षक सागर पोमण, वैभव पाटील, प्रकाश कातकाडे, पोलीस अंमलदार हेमंत खरात, दिपक भोसले, श्रीकांत कबुले, विशाल निचीत, स्वप्निल खणसे, सुभाष पाटील, नितेश बिचेवार, अतुल लोखंडे, प्रिया बसावे, प्रितम भालेराव, सरीता तुपे, धरती वाडेकर, ईश्वरी आंबरे, मोनिका चित्तेवार, महेश मोटकर, सुरज शिंदे, टेकाळे, सुरंजन चव्हाण, दिपाली टोपे, दिपाली चव्हाण सायबर पोलीस ठाणे यांच्या पथकाने केली आहे.

# प्रजासत्ताक दिनानिमित्त इंद्रायणीनगरमध्ये 350 फुट तिरंगा रॅली

## रॅलीमध्ये 700 विद्यार्थ्यांचा सहभाग : अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतर्फे उपक्रम

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने भोसरी इंद्रायणीनगर येथे ३५० फुट लांब भव्य तिरंगा रॅली सकाळी ९ ते ११ यावेळेत काढण्यात आली. यारॅलीमध्ये ७०० विद्यार्थी, शिक्षकांसह १००० जण यामध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.



या रॅलीमध्ये भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे, महापालिका स्थायी समितीचे माजी अध्यक्ष विलास मडिगेरी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे इंद्रायणीनगर कार्यवाह गिरीश पटेल, प्रियदर्शनी इंग्लिश मिडियम स्कूलच्या मुख्याध्यापक ॲड. अर्पिता दीक्षित, मुख्याध्यापक जाधव मॅडम. उपमुख्याध्यापक पायल सिन्हा, सामाजिक कार्यकर्ते शिवराज लांडगे, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे प्रदेश मंत्री कुलकर्णी, शहर मंत्री सिद्धार्थ लाड, ओम रेड्डी यांच्यासह परिसरातील असंख्य नागरिक सहभागी झाले होते.

### विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप..

इंद्रायणीनगर येथील प्रियदर्शनी शाळेपासून रॅलीला सुरुवात झाली. पुढे मिनि मार्केट, महा देव मंदिर, समर्थ कॉलनी, श्री स्मामी समर्थ शाळा, तिरुपती चौक मार्गे श्री वैष्णोमाता मंदिराजवळ आल्यानंतर तिरंगा रॅलीचा समारोप झाला. प्रियदर्शनी इंग्लिश मिडियम स्कूलचे विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने या रॅलीतत सहभागी झाले होते. तर, रॅलीच्या मार्गावर ठिकठिकाणी फुलांची उघळण करीत स्वागत करण्यात आले. सोबत साऊंड स्पीकर DJ वर देशभक्तीपर गाणे लावले होते शेवटी सहभागी सर्व विद्यार्थ्यांना पाणी व खाऊचे वाटप करण्यात आले.

# पुण्यात 'जीबीएस'च्या रुग्णसंख्येतील वाढ सुरूच

## नागरिकांना पिण्याचे स्वच्छ पाणी मिळावे : आरोग्यमंत्री प्रकाश आबिकर यांचे निर्देश

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यात गुइलेन बॅरे सिंड्रोमच्या (जीबीएस) रुग्णांची संख्या १११ वर पोहोचली असून, आतापर्यंत एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे. राज्यात सर्वाधिक १०३ रुग्ण पुण्यात असून, १३ जण व्हेंटिलेटरवर आहेत. रुग्णसंख्येत वाढ सुरूच असल्याने महापालिकेच्या आरोग्य विभागाने बाधित भागात रुग्ण सर्वेक्षण करण्यावर भर दिला आहे.



राज्यातील एकूण रुग्णांपैकी ७७ पुरुष आणि ३४ महिला आहेत. सर्वाधिक रुग्ण पुणे परिसरात असून, त्यात पुणे महापालिका २०, पुणे महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेला भाग ६६, ग्रामीण ५, पिंपरी-चिंचवड महापालिका भागात १२, आणि इतर जिल्ह्यांतील ८ रुग्ण आहेत. राज्यातील एकूण रुग्णांपैकी ३१ रुग्णांचे जीबीएसचे निश्चित निदान झाले आहे, अशी माहिती आरोग्य विभागाने दिली.

रुग्णांचे शौच, रक्त आणि लघवी नमुने आरोग्य विभागाने तपासणीसाठी राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेत (एनआयव्ही) पाठविण्यात येत आहेत. एनआयव्हीकडे पाठविण्यात ७६ रक्त नमुन्यांमध्ये डेंग्यू, चिकुनगुन्या आणि झिका संसर्ग आढळून आलेला नाही. एनआयव्हीकडे ५७ रुग्णांचे शौचनमुने पाठविण्यात आले. त्यात १७ नमुन्यांमध्ये नोरोव्हायरस हा विषाणूसंसर्ग आणि ५ नमुन्यांमध्ये कॅम्पायलोबॅक्टर जेजुनी हा जीवाणूसंसर्ग आढळला, असेही आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.

पुणे महापालिका, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि जिल्हा प्रशासनाकडून बाधित भागांमध्ये तातडीने रुग्ण सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. 'जीबीएस'ची लक्षणे दिसून येणाऱ्या रुग्णांचा शोध आरोग्य विभागाची पथके घेत आहेत. रुग्ण आढळून आलेल्या परिसरात आरोग्य विभागाकडून ४५ हजार ५२ घरांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. महापालिका आणि आरोग्य विभागाने यासाठी ८६ पथके तैनात केली आहेत. याचबरोबर खासगी डॉक्टरांनी जीबीएसचे रुग्ण आढळल्यास तातडीने आरोग्य विभागाला कळविण्याबाबत सूचना करण्यात आल्या आहेत.

### जीबीएसची तपासणी

- » रुग्णांच्या ५७ शौच नमुन्यांची तपासणी
- » १७ शौच नमुन्यांत नोरोव्हायरस
- » ५ शौच नमुन्यांत कॅम्पायलोबॅक्टर जेजुनी
- » रुग्णांच्या ७६ रक्त नमुन्यांची तपासणी
- » सर्व रक्त नमुन्यांमध्ये झिका, डेंग्यू, चिकुनगुन्या संसर्ग नाही

### चार मेंदूविकार तज्ज्ञ महापालिकेच्या रुग्णालयात सेवा देणार

पुणे शहरात गुइलेन बॅरे सिंड्रोम (जीबीएस) च्या रुग्णांसाठी महापालिकेच्या कमला नेहरू रुग्णालयात मोफत उपचारांची सुविधा दिली जाणार आहे. या आजाराच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी महापालिकेकडे मेंदूविकार तज्ज्ञ (न्यूरोलॉजिस्ट) महापालिकेकडे नसल्याने उपचारात अडचणी येणार होत्या. मात्र, महापालिकेने केलेल्या आवाहनानंतर चार मेंदूविकार तज्ज्ञांनी महापालिकेच्या रुग्णालयात सेवा देण्याची तयारी दाखविली आहे. एका डॉक्टरांच्या सेवेला सुरुवातही झाली आहे. राजाराम पूल ते खडकवासलादरम्यान महापालिका हद्दीतील भागाला बाधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे. या ठिकाणी घरोघरी जाऊन महापालिकेकडून सर्वेक्षण केले जात आहे. ८५ पथके त्यासाठी नेमली आहेत. या आजारावर नियंत्रण मिळवण्यास यश मिळत असल्याची माहिती आरोग्य विभागाच्या प्रमुख डॉ. नीना बोराडे यांनी दिली.

# चिंचवड आणि थेरगावला जोडणाऱ्या बटरफ्लाय पुलाला मुहूर्त मिळेना

## अतिक्रमणामुळे पुलाच्या लोकार्पणास विलंब : सात वर्षांनंतरही पूल वाहतुकीस खुला नाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड आणि थेरगाव गावांना जोडणारा पवना नदीवर बटरफ्लाय आकारातील स्टील गर्डरमधील पुलाच्या उभारणीचे काम पूर्ण झाले आहे. पुलाला जोडणाऱ्या जोड रस्त्याचे काम गेल्या दीड वर्षांपासून अपूर्ण आहे. त्यामुळे सात वर्षे होऊनही पुलाचे काम अपूर्ण असल्याने स्थानिक नागरिकांमधून महापालिकेच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली जात आहे.



चिंचवडगाव ते थेरगावाला जोडणारा बटरफ्लाय आकारातील स्टील गर्डर पूल उभारण्यात येत आहे. थेरगाव येथील विकास आराखड्यातील १८ मीटर रस्त्यावर हा पूल तयार केला जात आहे. मोरया गोसावी मंदिरपासून काही अंतरावर पवना नदीवर साकारणारा हा पूल थेरगाव आणि चिंचवड अशा दोन गावांना जोडणारा आहे. महापालिकेच्या २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात पुलाच्या कामासाठी निविदा काढण्यात आली. त्यानंतर प्रत्यक्ष कार्यादेश देऊन कामाला सुरुवात झाली. या पुलाच्या कामासाठी २५ कोटी १९ लाख रुपये इतका खर्च मंजूर आहे. या पुलासाठी नदीपात्रामध्ये कोणताही पिलर टाकलेला नाही. त्यामुळे पवना नदीचा प्रवाह सुरळीत वाहू शकणार आहे.

थेरगाव पवना नदीवर साकारत असलेला बटरफ्लाय प्रकारातील राज्यातील हा पहिलाच पूल आहे. पुलावरील डांबरीकरण आणि जोड रस्त्याचे काम वेगात सुरू आहे. १०७ मीटर लांबीचा हा पूल आहे. १८ ते २८. मीटर इतकी पुलाची रुंदी आहे. महापालिकेकडून उभारण्यात येणाऱ्या या पुलाला सात वर्षे लोटली तरीही पुलाचे काम पूर्ण झालेले नाही. पुलाचे काम वेगात सुरू असल्याचे अधिकारी सांगत असले तरीही पुलाला जोडणाऱ्या एका बाजूला काम अपूर्ण आहे, तर हे प्रलंबित काम वेगाने पूर्ण करण्याचे काम महापालिकेसमोर असणार आहे.

### वाहतुकीचा ताण कमी होणार

» **थेरगाव आणि चिंचवडला जोडणारे दोन पूल सध्या पवना नदीवर आहेत. बिर्ला रुग्णालयाजवळ मोठा, तर धनेश्वर मंदिराजवळ छोटा पूल आहे. हा छोटा पूल अरुंद असल्याने येथून अवजड वाहनांची वाहतूक होत नाही. त्यामुळे प्रसूनधाम सोसायटीशेजारी नव्याने उभारण्यात येत असलेला पूल वाहतुकीसाठी फायदेशीर ठरणार आहे. या पुलाने थेरगाव येथील चिंचवड आणि तेथून पिंपरी सहजतेने ये-जा करणे वाहनचालकांना शक्य होणार आहे.**

> बटरफ्लाय पुलाच्या जोडरस्त्यानजिक एका सोसायटीची भिंत असून, या रस्त्याच्या खोदकामामुळे या संरक्षक भिंतीला धोका निर्माण होऊ शकतो, असा आक्षेप घेत, ठेकेदाराविरोधात या सोसायटी पदाधिकाऱ्यांनी पोलिसांत तक्रार दिली होती. त्यामुळे हे काम रखडले होते. मात्र, सोसायटीचे पदाधिकारी, ठेकेदार व महापालिका अधिकारी यांची पोलीस स्टेशनमध्ये एकत्रित बैठक झाली असून, सोसायटीने या कामाला होकार दिल्याने हे काम सुरू करण्यात आले आहे.
>
> **- देवन्ना गट्टूवार, सहशहर अभियंता, स्थापत्य विभाग, महापालिका.**

# महापालिकेच्या ऐतिहासिक कार्यक्रमाची 'वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये नोंद

## भारतातील विविध राज्यांतून आलेल्या दीडशे कलाकारांनी सांकेतिक भाषेसह तब्बल 16 भाषांमध्ये भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे गायन केले.

**पिंपरी | प्रतिनिधी**

नेपाळसह भारतातील विविध राज्यांतून आलेल्या दीडशे कलाकारांनी सांकेतिक भाषेसह तब्बल १६ भाषांमध्ये भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे गायन केले. अशाप्रकारे सांगितिक कार्यक्रमातून भारतीय संविधानाला मानवंदना देणाऱ्या पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या या ऐतिहासिक कार्यक्रमाची नोंद वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये झाली आहे.

भारतीय संविधानाला यंदा ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. या अमृतमहोत्सवी वर्षपूर्तीबद्दल भारतीय संविधानाला सांगितिक मानवंदना देण्यासाठी प्रजासत्ताक दिनी (२६ जानेवारी) पिंपरी-चिंचवड महापालिकेने आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांच्या नियंत्रणाखाली 'आम्ही भारताचे लोक' (हम भारत के लोग) हा दीडशे कलावंतांचा सहभाग असलेला भव्य सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला होता.

पिंपरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाजवळील मैदानात हजारोंच्या उपस्थितीत विभिन्न भाषेतून भारतीय संविधानाला मानवंदना देण्यात आली. या ऐतिहासिक सोहळ्याची नोंद 'वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये झाली आहे. याबाबतची घोषणा वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डच्या कार्यकारी अधिकारी प्रीती मेनन यांनी या कार्यक्रमात ऑनलाइन सहभागी होत केली. त्यानंतर कलाकारांसह नागरिकांनी उत्स्फूर्तपणे भारतीय संविधानाचा जयघोष करीत जल्लोष साजरा केला. कार्यक्रमाच्या प्रारंभी महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पिंपरी येथील पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

'मिले सुर मेरा तुम्हारा' या विविधतेतून एकतेचा संदेश देणाऱ्या बहुभाषिक गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. 'भारत हमको जान से प्यारा है, जिंदगी मौत ना बन जाए संभालो यारो, ये मेरा संविधान', अशा विविध गीतांचे गायन विविध राज्यातील बहुभाषिक कलाकारांनी केले. यानंतर भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेच्या गायनाला प्रारंभ करण्यात आला. यामध्ये हिंदी, मराठी, इंग्रजी, संस्कृत, उर्दू, पाली, कोकणी, आसामी, कन्नड, पंजाबी, गुजराती, नेपाळी, मल्याळम, भोजपुरी, बंगाली अशा १५ भाषांमध्ये भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे गायन करण्यात आले. पिंपरी-चिंचवड महापालिका दिव्यांग भवनच्या फाऊंडेशनच्या वतीने सांकेतिक भाषेमध्येही संविधानाच्या प्रास्ताविकेचे सादरीकरण करीत भारतीय संविधानाला मानवंदना दिली. प्रांतिक पोषाख परिधान करून केलेल्या या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.

अशा प्रकारे सांकेतिक भाषेसह तब्बल १६ भाषांमध्ये भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे गायन झालेला हा पहिला कार्यक्रम असल्याने त्याची वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. महापालिकेने राबवलेल्या या उपक्रमाच्या माध्यमातून भारतीय संविधानाला अनोखी मानवंदना देण्यात आली.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान निर्मितीसाठी केलेला संघर्ष आणि जीवन प्रवास नाट्याविष्काराच्या माध्यमातून उलगडून दाखवण्यात आला. आंबेडकर यांनी तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्याकडे भारतीय संविधानाची प्रत सुपूर्द केली, त्या क्षणाचा प्रसंगदेखील यावेळी दाखवण्यात आला. संविधानाने दिलेले हक्क, अधिकार, भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये आणि या माध्यमातून उभे राहिलेले सक्षम यशस्वी राष्ट्र याची मांडणी या सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे करण्यात आली. या उपक्रमाचे कौतुक सर्वस्तरातून करण्यात येत आहे. कार्यक्रमाचे निवेदक प्रवीणकुमार बनसोडे, पौर्णिमा भोर, सतीश तांदळे यांनी या कार्यक्रमाच्या माध्यमातून भारतीय संविधानाची महती विषद केली.



### लोकप्रिय गायकांचा सहभाग

» अश्वघोष कला आणि संस्कृती प्रतिष्ठान कोल्हापूरचे सुप्रसिद्ध गायक आणि संगीतकार कबीर नाईकनवरे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या कार्यक्रमामध्ये लोकप्रिय पंजाबी गायिका गिन्नी माही, अंजली बौद्ध, लोकप्रिय गुजराती गायक विशान काथड, भोजपुरी गायक ओंकार प्रिन्स, मल्याळम गायक सिद्धेश, कन्नड गायक नारायणस्वामी यांच्यासह प्रशांत शिराळे (हिंदी), विजय बनगे (मराठी), सनी समुद्रे (इंग्रजी), शफिक मुल्ला (उर्दु), ममता ठाकूर देसाई (संस्कृत), मार्गेश पाटील (नेपाळी), पंडित राठोड (कोकणी), सुजीत म्हेत्री (कन्नड), सिद्धराज पाटील (गुजराती), डॉ. महेंद्र कानडे (पंजाबी), रणजित शिवशरण (पाली) अशा दिग्गज गायकांसह सुमारे १५० कलाकारांनी सहभाग घेत भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे गायन केले.

> भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त महापालिकेच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. प्रजासत्ताक दिनी महापालिकेच्या वतीने सांकेतिक भाषेसह १६ विविध भाषांमध्ये भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे गायन करीत आपल्या संविधानाला विश्वविक्रमी मानवंदना दिली. या अनोख्या अलौकिक उपक्रमाची वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. पिंपरी चिंचवड शहरवासियांसाठी ही अभिमानाची गोष्ट आहे.
>
> - शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

# गुइलेन बॅरे सिंड्रोमच्या पार्श्वभूमीवर दररोज पाण्याची तपासणी

## दूषित पाणी आणि अस्वच्छता हे गुइलेन बॅरे सिंड्रोम आजाराला कारणीभूत ठरल्याने महापालिका पाणीपुरवठा विभाग सजग झाला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

दूषित पाणी आणि अस्वच्छता हे गुइलेन बॅरे सिंड्रोम (जीबी) आजाराला कारणीभूत ठरल्याने महापालिका पाणीपुरवठा विभाग सजग झाला आहे. या आजाराच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा विभागाकडून दररोज पाण्याची तपासणी केली जात आहे. तसेच शहरातील ३०० ठिकाणच्या पाण्याचे नमुने घेऊन ते पाणी दूषित तर नाही ना, याची तपासणी केली जात आहेत. त्यामुळे गुइलेन बॅरे सिंड्रोम आजाराचा फैलाव होऊ नये, म्हणून विशेष खबरदारी घेतली आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात गुइलेन बॅरे सिंड्रोमची (जीबी) लागण झालेल्या एका ६४ वर्षीय महिलेचा महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयात मृत्यू झाला. मात्र, त्या महिलेचा जीबी सिंड्रोमची लागण झाली असली तरी तिचा मृत्यू न्यूमोनिया या आजाराने झाल्याचे रुग्णालय प्रशासनाने म्हटले आहे. गुइलेन बॅरे सिंड्रोम हा अतिशय दुर्मीळ आजार आहे. काही हजारो लोकांपैकी एकाला हा आजार होतो. एखादा विषाणू किंवा बॅक्टेरियाच्या इन्फेक्शनमुळे हा आजार होत असल्याचा अंदाज आहे. दूषित पाणी, अस्वच्छता हे या आजाराला कारणीभूत ठरते. मात्र वेळीच उपचार केल्यावर याची तीव्रता कमी होऊ शकते. काहीही लक्षणे दिसल्यास लवकर डॉक्टरांकडे जावे. तसेच घाबरून जाऊ नये, असा सल्ला वैद्यकीय विभागाने दिला आहे.



### काय काळजी घ्यावी?

» वैद्यकीय विभागाने दिलेल्या माहितीनुसार, हा आजार फारच दुर्मीळ असल्याने याबद्दल सतर्क राहणे गरजेचे आहे. प्रत्येक नागरिकाने पिण्याचे पाणी दूषित राहणार नाही, याची काळजी घ्यावी. दररोज पिण्याचे पाणी बदलावे. तसेच पाणी उकळून प्यावे. यासोबतच नेहमी स्वच्छ आणि ताजे अन्न खावे. यामुळे तुम्हाला पोषक तत्त्व मिळतात. तसेच वैयक्तिक स्वच्छतेवर भर द्या. अस्वच्छ ठिकाणी, रस्त्यावरचे किंवा उघड्यावरील पदार्थ खाणे टाळावे. शिजवलेले आणि कच्चे अन्न एकत्र ठेवू नये, या उपयांद्वारे तुम्ही गुइलेन बॅरे लागण होणे टाळू शकता.

> भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त महापालिकेच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. प्रजासत्ताक दिनी महापालिकेच्या वतीने सांकेतिक भाषेसह १६ विविध भाषांमध्ये भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे गायन करीत आपल्या संविधानाला विश्वविक्रमी मानवंदना दिली. या अनोख्या अलौकिक उपक्रमाची वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. पिंपरी चिंचवड शहरवासियांसाठी ही अभिमानाची गोष्ट आहे.
>
> - शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

# इंदापूर बाजार समितीला शेतकरी निवाससाठी निधी देऊ

## उपमुख्यमंत्री अजित पवार : इंदापूर कृषी महोत्सव 2025चा समारोप

**पुणे | प्रतिनिधी**

इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समितीने अतिशय नेत्रदीपक कृषी प्रदर्शन, जनावरे, घोडेबाजार व डॉग शो आयोजित केला. यामुळे शेतकऱ्यांना नवनवीन आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख होते. त्याद्दष्टीने नवीन माहिती, तंत्रज्ञान यासोबतच जातिवंत जनावरांची ओळख इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समिती करत आहे ही समाधानाची बाब आहे. या बाजार समितीला शेतकरी निवास, उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने आयोजित इंदापूर कृषी महोत्सव 2025 च्या समारोप प्रसंगी उपमुख्यमंत्री अजित पवार बोलत होते. यावेळी क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, आमदार बाबासाहेब देशमुख, उपविभागीय कृषी अधिकारी तुळशीराम चौधरी, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक आप्पासाहेब जगदाळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तुषार जाधव, उपसभापती मनोहर ढुके, आजी, माजी संचालक मंडळ आदी उपस्थित होते.

यावेळी शेतीत प्रगती साधण्याच्या दृष्टीने शेतकऱ्याने शास्त्रज्ञासारखा विचार केला पाहिजे; शेतकरी संशोधक असला पाहिजे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केले. या ठिकाणी अनेक वेगवेगळ्या प्रकारची उत्पादने, आधुनिक शेतीची साधने, महिला बचत गटांची उत्पादने, गृहोपयोगी वस्तू पाहायला मिळाल्या. पुणे जिल्ह्यातील एकमेव घोडेबाजार या ठिकाणी पाहायला मिळाला. महाराष्ट्रातील देशातील दोनशे प्रकारची जातीवंत घोडे वैशिष्ट्यपूर्ण डॉग शो, खिलार जनावरे, बैल, गाई या ठिकाणी पाहायला मिळाले.

इंदापूर तालुक्यातील शेतकरी डाळिंब, केळी, पेरू, द्राक्षे, ड्रॅगन फ्रुट आदी फळबागांत अग्रेसर आहे. येथील शेतकऱ्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे द्राक्षाचे वाण तयार केले आहेत. हे पाहता शेतकऱ्याने शास्त्रज्ञासारखा विचार केला पाहिजे. शेतीत आधुनिक तंत्रज्ञान वापरले पाहिजे. शेतीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, पिकाला माफक पाणी देण्याची पद्धत, ऊसाचे उत्पादन वाढविणे, चांगल्या प्रकारची फुले, फळे कशी पिकवावीत याबाबतचे ज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविले पाहिजे. आपल्याकडे शेतीत आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, इतर राज्यातील, देशातील तंत्रज्ञान आणावे लागेल, अशी सूचनाही उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी केली.

यावेळी उपमुख्यमंत्री पवार यांनी जनावरांचे प्रदर्शन, घोड्यांची शर्यत, डॉग शो पाहिला व यातील उत्कृष्ट ठरलेल्या जनावरांच्या मालकांना बक्षिसे वितरीत केली. विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमात उत्कृष्ट ठरलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळेच्या विद्यार्थ्यांनाही बक्षीस वितरण केले.



### शेतीत आधुनिक तंत्रज्ञान वापरले पाहिजे - अजित पवार

» अजित पवार म्हणाले, इंदापूर तालुक्यातील शेतकरी डाळिंब, केळी, पेरू, द्राक्षे, ड्रॅगन फ्रुट आदी फळबागांत अग्रेसर आहेत. येथील शेतकऱ्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे द्राक्षाचे वाण तयार केले आहेत. हे पाहता शेतकऱ्याने शास्त्रज्ञासारखा विचार केला पाहिजे. शेतीत आधुनिक तंत्रज्ञान वापरले पाहिजे.

### शेतकऱ्यांना पुढे जाणे गरजेचे आहे

» आपल्या कृषी प्रधान देशात कृषी विकासाला प्रचंड क्षमता आहे. कृषी क्षेत्रात शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासाला वाव देऊन अनेक संधीचा लाभ देता येऊ शकतो. शेतीतून मिळणारे उत्पादन खाद्यासोबतच देशाच्या उद्योग व्यवसाय प्रक्रियेत वापरले जाते. आता जगामध्ये जागतिक हवामान बदलासह शेतीसमोर अनेक आव्हाने असून त्यामुळे कृषी मालाचा पुरवठा कमी होऊ शकतो. निविष्ठा खर्चामुळे शेतकऱ्यांना पुरेसे उत्पन्न मिळत नाही. लांब आणि खंडित जमीन असल्यामुळे उत्पादकता कमी होते. यावर मात करून शेतकऱ्यांना पुढे जाणे गरजेचे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांकरिता आगामी अर्थसंकल्पात शक्य तितकी मदत करण्यात येईल. सरकार जास्तीत जास्त देण्याचा प्रयत्न करत असताना गैरफायदाही घेण्याचा प्रकार होऊ नये, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी केले.

### इंदापूरच्या कृषी प्रदर्शनातील वैशिट्ये

- » अनेक वेगवेगळ्या प्रकारची कृषी उत्पादने
- » शेतीची आधुनिक साधने
- » महिला बचत गटांची उत्पादने
- » गृहोपयोगी वस्तू
- » पुणे जिल्ह्यातील एकमेव घोडेबाजार
- » देशातील दोनशे प्रकारचे जातीवंत घोडे
- » डॉग शो, खिलार जनावरे, बैल, गाई

# अकलूजला रंगणार भव्य ओपन बैलगाडी शर्यत

## तहसील कार्यालयात कर्मचाऱ्यांची तब्बल 13 पदे रिक्त असून अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे नागरिकांची तहसील कार्यालयातील अनेक कामे खोळंबली आहेत

**पुणे | प्रतिनिधी**

शंकरनगर-अकलूज येथील श्री विजय गणेशोत्सव मंडळ ट्रस्टच्या वतीने 'सहकार महर्षी केसरी भव्य ओपन बैलगाडा शर्यत' शुक्रवार (दि. 7 फेब्रुवारी) क्रीडा संकुल समोरील पटांगणात होणार असल्याची माहिती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते पाटील यांनी दिली.

सहकार महर्षी काही शंकरराव मोहिते पाटील यांच्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित केलेल्या बैलगाडा शर्यतीची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील व ट्रस्टी ॲड. नितीन खराडे, तुकाराम जाधव, चंद्रकांत कुंभार, श्रीकांत राऊत, संतोष माने, वसुंधरा देवडीकर, शाहीनाज शेख, नानासाहेब काळे उपस्थित होते.

सहकार महर्षी केसरी भव्य ओपन बैलगाडा शर्यती 500 पेक्षा अधिक गाड्या सहभागी होतील. शर्यतीत प्रथम पारितोषिक 1.50 लाख रुपये रोख व चषक, द्वितीय 1 लाख 10 हजार, तिसरे 75 हजार, चौथे 60 हजार, पाचवे 50 हजार, सहावे 30 हजार, सातवे 20 हजार, आठवे 10 हजार आणि सेमी फायनलमध्ये दोन नंबर उतरणाऱ्या गाडीस योग्य बक्षीस दिले जाणार आहे. बैलगाडा शर्यत प्रेक्षकांना पाहता यावी यासाठी गॅलरी तसेच महिलांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था 24 तास लाईट पाणी आदींची सोय केली असल्याचेही श्री मोहिते पाटील यांनी सांगितले.

सात फेब्रुवारी रोजी विजयसिंह मोहिते पाटील यांच्या शुभहस्ते सकाळी आठ वाजता उद्घाटन होईल या यावेळी कारखान्यात चेअरमन जयसिंग मोहिते पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदन सिंह मोहिते पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, आमदार उत्तमराव जानकर तसेच अर्जुनसिंह मोहिते पाटील व बैलगाडी शर्यतीच्या संघटनेचे पदाधिकारी उपस्थितीत राहणार आहेत.



### ऑनलाइन नोंदणी आवश्यक

» या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ऑनलाइन नोंदणी शनिवार (25 जानेवारी) पासून सुरू झाली असून 6 फेब्रुवारीपर्यंत सकाळी नऊ ते पाच या वेळेत घेतली जाईल. ऑफलाइन नोंदणी घेतली जाणार नाही या स्पर्धेसाठी गट गुरुवार 6 फेब्रुवारी सायंकाळी सात नंतर ऑनलाईन काढले जातील.

### प्रथम बैलजोडीचा होणार सन्मान

» बैलगाडी शर्यती बैलगाडा मालकास रोख रक्कम व चषक दिले जाते; परंतु जिंकून देणाऱ्या बैलांना काहीच दिले जात नाही. या स्पर्धेत प्रथम येणाऱ्या बैल जोडीला मेडल, झूल व महर्षी चषकाचे बाशिंग देऊन बैलांचा सन्मान करण्यात येणार आहे.